दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. ०५ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ४६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## धोरणांचा नुसता सुकाळ, अंमलबजावणीचा दुष्काळ; सरकारी दिरंगाईचा फटका जनतेलाच

राज्यातील आपत्तीग्रस्त, दरडप्रवण आणि पूरग्रस्त भागातील नागरिकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी राज्य सरकार लवकरच एक नवे आणि सर्वसमावेशक 'पुनर्वसन धोरण' आणण्याच्या तयारीत आहे. आपद्ग्रस्तांना दिल्या जाणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळात वाढ करणे, या भागांत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वेगवान वारे वाहण्याची शक्यता आहे. याशिवाय तिरुवनंतपुरम, कोल्लम, पत्तनमथिट्टा, इडुक्की आणि त्रिशूरमध्ये मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.

-----> अग्रलेख - वाचा पान 2 वर

## ऑगस्ट 2026 मध्ये एकाच महिन्यात सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण

**मुंबई :** वैज्ञानिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या दोन मोठ्या खगोलीय घटना ऑगस्ट २०२६ मध्ये अनुभवायला मिळणार आहेत. अवघ्या दोन महिन्यांनंतर १५ दिवसांच्या अंतराने सूर्यग्रहण (Solar Eclipse) आणि चंद्रग्रहण (Lunar eclipse) एकाच महिन्यात घडणार आहे. १२ ऑगस्ट रोजी होणारे सूर्यग्रहण आणि २८ ऑगस्टचे चंद्रग्रहण जगातील विविध भागांतून पाहता येणार असून, खगोलप्रेमी आणि संशोधकांसाठी हा विशेष काळ ठरणार आहे.

# मोदींचे सरकार जाणार, आणीबाणी येणार : राहुल गांधी

### आर्थिक संकटावरून विरोधी पक्षनेत्यांचा थेट केंद्र सरकारवर निशाणा; भाजपकडून 'बहादूर शाह जफर' यांच्याशी तुलना करत जोरदार पलटवार



**मुंबई :** आखाती युद्धाचा धोका, इंधन पुरवठ्यावरील संकट, जगभरात सुरू असलेली आर्थिक मंदीची चर्चा आणि नोकरकपातीची टांगती तलवार अशा अत्यंत अस्थिर वातावरणात आता देशाच्या राजकारणात एक नवीन खळबळ उडाली आहे. संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशातील सत्ताधाऱ्यांविरोधात एक अत्यंत खळबळजनक दावा केला आहे. भारतावर मोठे आर्थिक संकट घोंघावत असल्याचे सांगतानाच, लवकरच हे सरकार कोसळणार असून देशात आर्थिक आणीबाणी लादली जाऊ शकते, असे मोठे भाकीत राहुल गांधी यांनी वर्तवले आहे. त्यांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

राहुल गांधी यांनी यापूर्वी अनेकदा देशातील आर्थिक परिस्थिती आणि वाढत्या महागाईवर केंद्रातील मोदी सरकारला धारेवर धरले आहे. मात्र, यावेळी त्यांनी पहिल्यांदाच थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय भवितव्याबाबत आणि केंद्र सरकारच्या स्थैर्याबाबत इतका मोठा आणि थेट दावा केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडी आणि देशांतर्गत आर्थिक धोरणे यांमुळे सध्याचे सरकार आपले नियंत्रण गमावून बसेल आणि परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर आणीबाणीसारखे पाऊल उचलले जाऊ शकते, असा इशारा विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या दाव्यातून दिला आहे.

राहुल गांधी यांच्या या खळबळजनक विधानानंतर सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने (भाजप) त्यांच्यावर अत्यंत तीक्ष्ण शब्दांत पलटवार केला आहे. राहुल गांधी हे दिवास्वप्न पाहत असल्याची टीका भाजपने केली आहे. भाजपच्या नेत्यांनी राहुल गांधी यांची तुलना थेट मुघल साम्राज्याचे अखेरचे बादशहा बहादूर शाह जफर यांच्याशी केली आहे. ज्याप्रमाणे बहादूर शाह जफर यांच्या काळात त्यांचे साम्राज्य संपुष्टात येत होते, तशीच काहीशी अवस्था आता काँग्रेस आणि राहुल गांधींची झाली आहे, असा टोला भाजपने लगावला आहे. विरोधी पक्षनेत्यांच्या या नव्या दाव्यामुळे आगामी काळात संसदेपासून ते रस्त्यापर्यंत राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धाचे सावट आणि देशातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधींनी केलेले हे भाकीत किती खरे ठरते आणि केंद्र सरकार या राजकीय हल्ल्यांना कसे उत्तर देते, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.



## हिंदू समाज जागृत होत असून त्याचे चांगले परिणाम समोर येत आहेत : मोहन भागवत

### संघाचा कार्यकर्ता विकास वर्ग सोहळा संपन्न



**नागपूर :** भारताचे भवितव्य ज्याच्या खांद्यावर आहे तो हिंदू समाज आता मोठ्या प्रमाणात जागृत होत असून, त्याचे अत्यंत सकारात्मक आणि चांगले परिणाम देशात समोर येत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले आहे. नागपूर येथील रेशीमबाग मैदानावर पार पडलेल्या संघाच्या 'कार्यकर्ता विकास वर्ग' (द्वितीय) च्या भव्य समारोप सोहळ्यात ते स्वयंसेवकांना मार्गदर्शन करत होते. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी देशातील प्रख्यात उद्योगपती आणि पद्मभूषण कुमारमंगलम बिर्ला हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनात सरसंघचालकांनी जागतिक परिस्थिती, हिंदू समाज आणि भारताच्या भूमिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण भाष्य केले. सध्या जगभरात सुरू असलेली अशांतता आणि युद्धाच्या वातावरणाचा उल्लेख करत त्यांनी, अशा विपरीत काळात संपूर्ण जगाला आज भारताची अत्यंत गरज असल्याचे सांगितले. आजचे जग केवळ त्याच देशांचे ऐकते ज्यांच्याजवळ शक्ती आहे, अशी खंत व्यक्त करत त्यांनी जागतिक महासत्तांच्या मनमानी कारभारावर कडक शब्दांत टीका केली. शक्तिशाली देश कमजोर देशांवर अन्याय करतात, त्यांच्या भूभागावर ताबा मिळवतात किंवा बॉम्ब टाकतात; मात्र जेव्हा भारत पूर्ण ताकदीने उभा राहील, तेव्हा ही परिस्थिती नक्कीच बदलेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हिंदू समाजाच्या एकसंधतेवर बोलताना डॉ. भागवत म्हणाले की, संघाने गेल्या अनेक दशकांत सर्व प्रकारचे जातीभेद पूर्णपणे नष्ट करून संपूर्ण हिंदू समाज संघटित करण्याची वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती विकसित केली आहे. हिंदू हा देशासाठी नेहमीच दायित्वशील राहिला आहे. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर स्वयंसेवक अहोरात्र समाजात जाऊन सामान्य जनतेशी थेट संपर्क साधत असल्याचे त्यांनी नमूद केले. देशाच्या इतिहासाचा संदर्भ देत ते म्हणाले की, ज्यांनी आपल्यावर हजार वर्षे राज्य केले, ते आपल्यापेक्षा श्रेष्ठ नव्हते. आपण आपल्याच काही श्रेष्ठ गोष्टी विसरल्यामुळे आपल्याला तो पराभव स्वीकारावा लागला होता, त्यामुळे आपल्याला तीच जुनी तयारी पुन्हा करावी लागणार आहे. संघ जे काही करत आहे, ते केवळ देशासाठी करत असून देशाचे हित सर्वोच्च राहणे हेच संघाचे ध्येय आहे. देशात आजही अंतर्गत फूट निर्माण करणाऱ्या काही भारतविरोधी ताकदी सक्रिय असून, त्यांना भारताची प्रगती रोखायची आहे, असा इशाराही त्यांनी दिला.

# ममता बनर्जींना आणखी एक जबर धक्का; तबल 20 खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत

**कोलकाता :** बंडखोर आमदारांच्या लाटेमुळे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसला आणखी एक धक्का बसला आहे. टीएमसी खासदारांमध्ये उलथापालथीची चर्चा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, किमान २० टीएमसी खासदार पक्ष बदलण्याच्या तयारीत आहेत. 'घर फिरले की घराचे वासेही फिरतात' अशी म्हण तुम्ही वाचली असेल किंवा कोणाला उदाहरण कोणाला सांगितलं असेल. राजकीय वर्तुळात ही म्हण पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसला अगदी तंतोतंत लागू होते. विधानसभा निवडणुकीत पराभव होताच टीएमसीचे एक-एक आमदार,नगरसेवक पक्षातून बाहेर पडू लागले आहेत. आता टीएमसी खासदार सुद्धा पक्षातून बाहेर पडणार असल्याची शक्यता आहे. जवळपास २० खासदार पक्षाला रामराम ठोकणार असल्याची चर्चा राज्यातील वर्तुळात सुरू आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंत ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसला एकापाठोपाठ एक धक्के बसत आहेत. आता टीएमसीच्या आमदारांनी पुकारलेल्या बंडामुळे खासदारांमध्ये उडाली असून जवळपास २० खासदार पक्षाला रामराम ठोकण्याच्या तयारीत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या संदर्भात उच्च स्तरावर चर्चा सुरू असून खासदारांनी निष्ठेला मुठमाती देत पक्ष बदलण्याच्या निर्णयावर एकमत करण्याचा निर्धार केला आहे.



### महाराष्ट्राच्या राजकारणाची प. बंगालमध्ये पुनरावृत्ती

**तृणमूल काँग्रेसमध्ये बंडखोरीची चर्चा अधिक तीव्र झाली आहे.**

**जवळपास 20 खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे.**

**विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षातील असंतोष वाढल्याचे मानले जात आहे.**

### ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये तृणमूल काँग्रेसचे एकूण ४१ खासदार आहेत. यामध्ये लोकसभेतील २८ आणि राज्यसभेतील १३ खासदारांचा समावेश आहे. जर २० खासदारांनी टीएमसी सोडली, तर विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षातच बंडखोरीला सामोरे जाणाऱ्या ममता बॅनर्जी यांना हा आणखी एक मोठा धक्का असेन.

जर टीएमसीच्या खासदारांच्या गटात फूट पडली तर ही ममता बॅनर्जी यांचा हा मोठा पराभव असण्याची शक्यता आहे. कारण विरोधी पक्षामध्ये दुसरा मोठा पक्ष आहे. जर येथे बंडखोरी झाली तर टीएमसी आणि विरोधी पक्ष खूप कमकुवत होईल. मात्र, बंगालमधील तृणमूल काँग्रेस (टीएमसी) विधिमंडळ पक्षात आधीच दोन गट पडले आहेत. आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील ६० आमदारांच्या एका बंडखोर गटाने स्वतःलाच खरी तृणमूल काँग्रेस म्हणून घोषित केले आहे. या गटाने ऋतब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती केली आहे. त्याला अध्यक्षांची मंजुरीही मिळवली आहे. या गटाने ममता बॅनर्जी यांच्या विरोधात उघडपणे बंड केले असून, विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणून त्यांच्या निवडीला आव्हान दिले आहे.

# कॉकरोच जनता पार्टीच्या सीबीएसई अध्यक्ष आणि सचिवांची उचलबांगडी

### चौकशीसाठी एस. राधा चौहान यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) 'ऑन-स्क्रीन मार्किंग' (ओएसएम) प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या कथित अनियमिततेनंतर केंद्र सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. 'कॉकरोच जनता पार्टी'ने (सीजेपी) या बदल्यांवरून केंद्र सरकारवर निशाणा साधला असून, या बदल्या म्हणजे केवळ एक दिखावा असल्याचा आरोप केला आहे.

सीबीएसईच्या डिजिटल उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेत म्हणजेच ऑन-स्क्रीन मार्किंगमध्ये गंभीर तांत्रिक त्रुटी आणि अनियमितता झाल्याचे आरोप समोर आले होते. या प्रणाली अंतर्गत विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका स्कॅन करून संगणकाच्या स्क्रीनवर तपासल्या जातात. यामुळे उत्तरपत्रिकांची जलद आणि निष्पक्ष तपासणी होते असा सीबीएसईचा दावा होता; मात्र ही पद्धत लागू झाल्यापासून विद्यार्थी आणि पालकांकडून असंख्य तक्रारी येत होत्या. निकाल जाहीर झाल्यानंतर पुनर्मूल्यांकन




प्रक्रियेत अचूक माहिती न मिळणे, अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी गुण मिळणे आणि काही ठिकाणी तर दुसऱ्याचीच उत्तरपत्रिका निकालात जोडली जाणे, अशा गंभीर तक्रारी पालकांनी केल्या आहेत. याशिवाय निकृष्ट स्कॅनिंग आणि तांत्रिक बिघाडामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप आहे.


या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने आता एक चौकशी समिती स्थापन केली आहे. क्षमता विकास आयोगाच्या (सीबीसी) अध्यक्षा एस. राधा चौहान यांच्याकडे या समितीचे नेतृत्व सोपवण्यात आले असून, त्यांना इतर विभागांतील अधिकाऱ्यांची मदत घेण्याची मुभा देण्यात आली आहे. ही समिती एका महिन्याच्या आत आपला तपास पूर्ण करून कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाला (डीओपीटी) अहवाल सादर करणार आहे.

# शासकीय जमिनीचे दर एक पट आणि खाजगी जमिनीचे दर पाचपट!

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान योजनेची होतेय 'फरपट'!

नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** वंचित घटकांतील भूमिहीन शेतमजुरांना हक्काची शेतजमीन देऊन त्यांना समाजात मानाचे स्थान आणि आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना' अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात या योजनेला जमीन खरेदीच्या जाचक अटी, शासकीय दरांमधील प्रचंड तफावत आणि प्रशासकीय उदासीनतेचा मोठा ब्रेक लागला आहे.




शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजने'ला जिल्ह्यात शासकीय दरांमधील तफावतीचा मोठा फटका बसला आहे असून चालू आर्थिक वर्षात (२०२५-२६) जिल्ह्यासाठी १५० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. मात्र, जमिनींचे गगनचुंबी बाजारभाव आणि शासनाचे अल्प दर यातील तफावतीमुळे प्रशासनाला वर्षभरात केवळ ६५ एकर जमीन खरेदी करता आली आहे. या खरेदीतून अवघ्या २० लाभार्थ्यांचे पुनर्वसन शक्य होणार असून, उर्वरित शेकडो लाभार्थी आजही हक्काच्या जमिनीपासून वंचित राहिल्याने योजनेच्या मूळ हेतूलाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे.

शासकीय जमिनीचे दर एक पट आणि खाजगी जमिनीचे दर पाच पट दरांच्या या चक्रव्यूहात योजनेचे स्वप्न रखडले असून वंचित घटक विकास आणि योजने पासून दूर आहे.

### 6 तालुक्यांत जमिनीचा तीव्र तुटवडा; शासकीय जमिनीअभावी संपूर्ण योजना ठप्प

**जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची भौगोलिक आणि प्रशासकीय स्थिती पाहता, तब्बल ६ तालुक्यांमध्ये जमीन खरेदीसाठी प्रशासनाला प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. गंगापूर, वैजापूर, पैठण, खुलताबाद, फुलंब्री आणि तालुका संभाजीनगर या ६ तालुक्यांमध्ये वाटपासाठी जमीन नाही. दुसरीकडे, खाजगी मालक आपल्या जमिनी शासनाला विकण्यास अजिबात तयार नसल्याने, या ६ तालुक्यांतील वंचित घटकांतील शेकडो पात्र लाभार्थ्यांची हक्काची शेती मिळण्याची प्रतीक्षा दिवसेंदिवस लांबत चालली आहे. या तालुक्यांमध्ये जमिनी शोधण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा राबत असल्याचा दावा करत असली, तरी प्रत्यक्षात मात्र जमिनीचा एक तुकडाही पदरात पडत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.**

### बाजारभावापुढे शासकीय दर ठरतोय अडथळा; दरवाढीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन

**खाजगी जमीन मालकांकडून जमीन खरेदी करताना 'दर निश्चित करणे' हा जिल्हा प्रशासनासमोरील सर्वात मोठा आणि कळीचा मुद्दा बनला आहे. शासनाने ठरवून दिलेले जमिनींचे दर चालू बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत नगण्य आणि जुनाट आहेत. सध्या शासनाकडून प्रति एकर जिरायती शेतीसाठी केवळ ₹ ५ लाख आणि बागायती शेतीसाठी ₹ ८ लाख इतकाच दर मंजूर केला जातो. प्रत्यक्षात आजच्या घडीला बाजारात जमिनींचे भाव यापेक्षा दुप्पट ते तिप्पट, तर काही ठिकाणी पाचपट आहेत. त्यामुळे कोणताही खाजगी शेतकरी आपली सुपीक जमीन या कवडीमोल दराने शासनाला विकण्यास तयार होत नाही. मात्र, या आर्थिक कोंडीवर विभागातून मिळालेली एक दिलासादायक माहिती अशी की, जमीन खरेदीचे हे शासकीय दर वाढवण्याचा ठोस प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन असून, त्यावर तातडीने प्रशासकीय कारवाई आणि मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास जमीन खरेदीचा मार्ग सुकर होऊ शकतो.**

### अत्यंत प्रयत्नांनी खरेदी झालेली 65 एकर जमीनही आचारसंहितेच्या फेऱ्यात अडकली

**जिल्हा प्रशासनाने विविध अडचणींवर मात करत, अनेक महिने पाठपुरावा करून जी ६५ एकर जमीन खरेदीची प्रक्रिया कशीबशी पूर्ण केली आहे, त्याचे वितरण पहिल्या टप्प्यात २० पात्र लाभार्थ्यांना करण्याचे नियोजन सामाजिक न्याय विभागाकडून करण्यात आले होते. या लाभार्थ्यांची निवड होऊन त्यांना जमिनीचा ताबा देण्याची तयारी अंतिम टप्प्यात आली होती. परंतु, ऐन वाटपाच्या वेळेसच जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाल्यामुळे या जमिनींचे अधिकृत वाटप आणि ताबा देण्याची प्रक्रिया तूर्तास थांबवण्यात आली आहे. परिणामी, सर्व कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण होऊन आणि डोळ्यांसमोर हक्काची जमीन दिसत असूनही, केवळ आचारसंहितेच्या तांत्रिक अडचणीमुळे या २० लाभार्थ्यांना जमिनीचा ताबा मिळण्यासाठी आणि स्वतःच्या शेतात नांगर चालवण्यासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे हे मात्र नक्की.**

# मातीच्या ढिगारात मानवी कवटी; जासई येथील बेकायदेशीर उत्खननाला गुन्हेगारीचे वळण!

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** एका बाजूला निसर्गाचा संहार करत डोंगर पोखरले जात असतानाच, आता उरण तालुक्यातील जासई मध्ये चक्क मानवी अवशेष सापडल्याने संपूर्ण रायगड जिल्हा हादरला आहे. दादरपाडा बस स्थानकासमोरील बिअर शॉप जवळ टाकण्यात आलेल्या मातीच्या ढिगाऱ्यात एक मानवी कवटी आढळून आली आहे. या भयानक प्रकारामुळे बेकायदेशीर माती उपशाच्या मागे एखादे मोठे गुन्हेगारी रॅकेट किंवा हत्याकांडाचे रहस्य दडले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जासईतील बेकायदेशीर उत्खननाला गुन्हेगारीचे वळण लागले आहे.उरण तालुक्यात सध्या कायद्याचे नियम धाब्यावर बसवून 'माती खोदा आणि पैसे कमवा' हा एकच अजेंडा राबवला जात आहे. स्थानिक माती माफियांनी जासई परिसरातील डोंगरांची अशी काही चाळण केली आहे की, आता या डोंगरांना 'खड्डा योजना' पुरस्कार देण्याची वेळ आली आहे. निसर्गाचे आणि शेतजमिनींचे कंबरडे मोडून सुरू असलेल्या या व्यवसायातून माणुसकी पुरती गाडली गेली आहे. निसर्गाच्या या 'पोस्टमॉर्टम'च्या बाजारात आता चक्क माणसांची हाडे आणि कवटी बाहेर येऊ लागल्याने परिसरात कमालीची घबराट पसरली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे भर वस्तीत आणि रस्त्याच्या कडेला मानवी शरीराचा भाग सापडूनही स्थानिक महसूल आणि पोलीस प्रशासन कमालीचे शांत आहे. सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असताना, अधिकारी मात्र कोणतीही हालचाल करायला तयार नाहीत. या ढिम्म कारभारामुळे "भरावात माणसाची कवटी सापडते, पण प्रशासनाची कवटी का हलत नाही?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



### यंत्रणांना 'प्रसादा'ची बाधा

झाली आहे का?हा सवाल उपस्थित होत आहे.

स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जासई आणि परिसरातून दररोज रात्री अप रात्री आणि दिवसाढवळ्या हजारो डंपर माती चोरून नेले जाते या अवैध वाहतुकीला राजाश्रय मिळण्यासाठी प्रति डंपर प्रसाद वाटला जात आहे एवढा मोठा गैरवावर उघड सुरू असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोपनीय शाकाहारींचे तहसीलदार नेमके कोणाच्या आशीर्वादाने डोळे झाकून बसले आहेत असा थेट आरोप आता केला जात आहे.

सापडलेली कवटी नेमकी कुठून आली यावरून आता संशयाचे धोके घडत झाले आहे हा मातीचा भराव मुंबईतील एखाद्या जुन्या पुलाच्या डेब्रिज कामातून आणला आहे की स्थानिक डोंगरातून आज कवटी सापडली उद्या मृतदेह सापडण्याची पण भीती व्यक्त होत आहे हा प्रकार केवळ पर्यावरणाचा ऱ्हास नसून गंभीर गुन्ह्याशी संबंधित असल्याने पुढील पोलिसांनी तहसीलदार यांनी मूग गिळून गप्प न बसता या प्रकरणाचा तपास सीआयडी कडे सोपवावा आणि ती कवटी कोणाची आहे याचा छडा लावावा अशी मागणी आता जनतेतून केली जात आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## धोरणांचा नुसता सुकाळ, अंमलबजावणीचा दुष्काळ; सरकारी दिरंगाईचा फटका जनतेलाच

राज्यातील आपत्तीग्रस्त, दरडप्रवण आणि पूरग्रस्त भागातील नागरिकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी राज्य सरकार लवकरच एक नवे आणि सर्वसमावेशक 'पुनर्वसन धोरण' आणण्याच्या तयारीत आहे. आपद्ग्रस्तांना दिल्या जाणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळात वाढ करणे, घरकुल अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणे आणि पुनर्वसन वसाहतींमध्ये आधुनिक सोयी-सुविधांचा समावेश करणे या बाबींचा यात समावेश असेल, असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. कागदावर पाहता या घोषणा अतिशय आकर्षक आणि दिलासादायक वाटू शकतात; परंतु प्रत्यक्षात या धोरणांच्या नावाखाली होणाऱ्या सरकारी दिरंगाईमुळे जनतेचे किती मोठे आर्थिक आणि मानसिक नुकसान होणार आहे, याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. आधीच संकटात सापडलेल्या सामान्य जनतेला पुन्हा एकदा नव्या नियमांच्या चक्रव्यूहात अडकवण्याचाच हा प्रकार म्हणावा लागेल. सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, जेव्हा सरकार एखादे 'नवे धोरण' आणण्याची घोषणा करते, तेव्हा जुन्या निकषांनुसार सुरू असलेल्या प्रक्रिया तात्काळ थंडावतात. १४ ऑक्टोबर २०२२ च्या जुन्या शासन निर्णयातील निकष बदलून नवीन धोरण तयार केले जाईल, असे सांगण्यात आले आहे. मात्र, हे नवीन धोरण प्रत्यक्षात कधी अंमलात येईल, याचा कोणताही निश्चित कालावधी स्पष्ट करण्यात आलेला नाही. याचा थेट परिणाम असा होईल की, जे पुनर्वसनाचे प्रस्ताव आधीच मंजुरीच्या अंतिम टप्प्यात होते, ते आता नव्या धोरणाच्या नावाखाली महिने किंवा वर्षानुवर्षे लाल फितीत अडकून पडतील. प्रशासकीय दिरंगाईमुळे पुनर्वसनाचा हा काळ जितका लांबेल, तितका धोका दरडप्रवण आणि पूरग्रस्त भागात राहणाऱ्या निष्पाप नागरिकांच्या जीवाला निर्माण होणार आहे. पुढचा पाऊस किंवा एखादी मोठी आपत्ती येईपर्यंत जर हे धोरण केवळ कागदावरच राहिले, तर होणाऱ्या संभाव्य जीवितहानीला सर्वस्वी सरकारची ढिसाळ यंत्रणाच जबाबदार असेल. दुसरीकडे, शेतकऱ्यांच्या बाबतीतही सरकारची हीच संथ आणि उदासीन वृत्ती समोर आली आहे. खरीप हंगाम २०२५-२०२६ मधील अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची मदत अजूनही रखडलेली आहे. आता कुठे सरकारला 'ॲग्रीस्टॅक' डेटा तपासण्याची आणि 'ई-केवायसी' अपडेट करण्यासाठी विशेष शिबिरे घेण्याची आठवण झाली आहे. हवालदिल झालेल्या शेतकऱ्याला खरी गरज असते ती ऐन संकटाच्या वेळी तातडीने आर्थिक मदत मिळण्याची; परंतु सरकारी यंत्रणेच्या संथ कारभारामुळे हक्काचा निधी मिळवण्यासाठी शेतकऱ्याला वर्षभर वाट पाहावी लागते. या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडते, नवीन पिकासाठी त्यांना सावकारांचे उंबरठे झिजवावे लागतात आणि कर्जबाजारीपणा वाढून शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. शेतकरी आत्महत्यांची प्रलंबित प्रकरणे अजूनही निकाली निघालेली नाहीत, ही वस्तुस्थितीच सरकारची असंवेदनशीलता उघड करणारी आहे. त्याचप्रमाणे, राज्यात यंदा पाऊस कमी पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अशा गंभीर परिस्थितीत पाण्याचे चोख नियोजन आणि चारा छावण्यांचे प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करून शासनाकडे सादर करण्याच्या केवळ सूचना दिल्या जात आहेत. वास्तविक पाहता, उन्हाळा तीव्र होण्यापूर्वीच या उपाययोजना जमिनीवर दिसणे गरजेचे होते. परंतु, ऐन टंचाईच्या काळात केवळ बैठका घेऊन विहिरी अधिग्रहित करण्याचे आदेश सुटत आहेत. सरकारच्या या पूर्व नियोजनाच्या अभावामुळे ग्रामीण भागातील जनतेला पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती करावी लागत असून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. थोडक्यात सांगायचे तर, केवळ नवीन धोरणांची घोषणा करून जनतेचे प्रश्न सुटत नाहीत. जोपर्यंत ही धोरणे विहीत कालावधीत आणि संवेदनशीलतेने राबवली जात नाहीत, तोपर्यंत सामान्य नागरिक, लहान दुकानदार, टपरीधारक आणि शेतकरी केवळ सरकारी आश्वासनांच्या बळी ठरत राहतील. सरकारने आता केवळ बैठकांचा फार्स न करता, तातडीने अंमलबजावणीवर भर दिला पाहिजे; अन्यथा या धोरणांच्या विळख्यात जनतेचे कधीही भरून न निघणारे नुकसान होत राहील.

# महागाई : बदलत्या काळातील नवे वास्तव

महागाई हा अर्थशास्त्रातील सर्वाधिक चर्चिला जाणारा आणि सर्वसामान्यांच्या जीवनाशी सर्वाधिक निगडित विषय आहे. परंतु महागाईकडे पाहण्याची आपली पारंपरिक दृष्टी आजच्या बदलत्या आर्थिक आणि सामाजिक वास्तवाला पूर्णपणे न्याय देते का, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कारण महागाई ही केवळ वस्तूंच्या किंमती वाढण्याची घटना नसून, ती समाजाच्या जीवनमानावर, संधींवर, अपेक्षांवर आणि भविष्यातील विश्वासावर परिणाम करणारी व्यापक प्रक्रिया आहे.

सामान्यतः महागाईचा अर्थ वस्तू आणि सेवांच्या किंमतींमध्ये कालांतराने होणारी वाढ असा घेतला जातो. ही व्याख्या अर्थशास्त्रीयदृष्ट्या योग्य असली तरी ती मानवी अनुभवाचे संपूर्ण चित्र मांडत नाही. एखाद्या कुटुंबाच्या दृष्टीने महागाई म्हणजे फक्त बाजारातील वाढलेले भाव नसतात; ती मुलांच्या शिक्षणासाठी वाढलेला खर्च, आरोग्यसेवेसाठी लागणारा अधिक निधी, घरभाड्याचा वाढता भार आणि भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेबाबत निर्माण होणारी चिंता यांचाही समावेश असतो.

गेल्या काही दशकांत जगभरातील अर्थव्यवस्था झपाट्याने बदलल्या आहेत. एकेकाळी अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा मानल्या जात होत्या. आज मात्र दर्जेदार शिक्षण, आरोग्यसेवा, डिजिटल संपर्क, वाहतूक, विमा आणि कौशल्यविकास यांशिवाय सन्माननीय जीवनाची कल्पना करणे कठीण झाले आहे. त्यामुळे जीवनावश्यक खर्चाचे स्वरूप विस्तारले आहे आणि महागाईची पारंपरिक चौकट अधिक व्यापक करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

उदाहरणार्थ, एखाद्या वर्षी अन्नधान्याच्या किंमती तुलनेने स्थिर राहू शकतात; परंतु त्याच काळात शैक्षणिक शुल्क, वैद्यकीय खर्च किंवा घरभाडे लक्षणीयरीत्या वाढू शकते. अशा परिस्थितीत अधिकृत आकडेवारी मर्यादित वाढ दर्शवत असली, तरी अनेक कुटुंबांना प्रत्यक्ष जीवन अधिक महाग झाल्याची जाणीव होऊ शकते. यावरून स्पष्ट होते की महागाई ही केवळ सांख्यिकीय संकल्पना नसून एक मानवी अनुभवदेखील आहे.

महागाईचे स्वरूप सर्व समाजघटकांसाठी समान नसते. ग्रामीण भागातील कुटुंबांसाठी शेतीसंबंधित खर्च, इंधन आणि वाहतूक अधिक महत्त्वाची असते; तर शहरी भागात निवास, शिक्षण आणि आरोग्यसेवा हे खर्च निर्णायक ठरतात. त्याचप्रमाणे अल्प उत्पन्न गट, मध्यमवर्ग आणि उच्च उत्पन्न गट यांना महागाईचे परिणाम वेगवेगळ्या प्रकारे जाणवतात. म्हणूनच महागाईचा अभ्यास करताना विविध स्तरांवरील वास्तव समजून घेणे आवश्यक ठरते.

आर्थिक विकासाचा अंतिम उद्देश केवळ उत्पादन आणि उत्पन्न वाढवणे नसून नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित, सक्षम आणि सन्माननीय बनवणे हा असतो. त्यामुळे महागाईचा विचार करताना केवळ किंमतींची वाढ नव्हे, तर नागरिकांची क्रयशक्ती, बचत करण्याची क्षमता, जीवनमानाची गुणवत्ता आणि भविष्यातील संधी यांचाही विचार करणे आवश्यक आहे. जेव्हा उत्पन्नवाढ महागाईच्या वेगाशी स्पर्धा करू शकत नाही, तेव्हा आर्थिक प्रगतीची फळे सर्वसामान्यांपर्यंत पूर्णपणे पोहोचत नाहीत.

इतिहासात अनेक समाजांनी आर्थिक प्रगती अनुभवली; परंतु शाश्वत समृद्धी त्याच समाजांना लाभली ज्यांनी विकासाच्या केंद्रस्थानी माणसाला ठेवले. अर्थव्यवस्थेतील आकडे महत्त्वाचे असतात, कारण ते दिशा दाखवतात; परंतु त्या आकड्यांच्या मागे असलेले मानवी जीवन अधिक महत्त्वाचे असते, कारण ते वास्तव सांगते. म्हणूनच आधुनिक काळात महागाईचे मूल्यांकन करताना आर्थिक निर्देशांकांबरोबरच जीवनाच्या गुणवत्तेलाही समान महत्त्व दिले पाहिजे.

शेवटी, महागाई ही केवळ किंमती वाढण्याची कथा नाही; ती समाजाच्या बदलत्या गरजा, आकांक्षा आणि जीवनमानाचे प्रतिबिंब आहे. बदलत्या काळानुसार तिची व्याख्या, मोजमाप आणि विश्लेषण अधिक व्यापक, मानवी आणि वास्तवाधिष्ठित असणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही राष्ट्राची खरी समृद्धी बाजारातील आकड्यांत नव्हे, तर त्याच्या नागरिकांच्या जीवनातील स्थैर्य, संधी आणि समाधानात प्रतिबिंबित होत असते.

महागाईचे खरे आकलन तेव्हाच शक्य होते, जेव्हा आपण आकड्यांपलीकडे जाऊन माणसाच्या जीवनाकडे पाहतो.

**लेखक** : पांडुरंग मारुती धुमाळ

# आरएसपीएल समूहाने भारताच्या विकासकथेत योगदान देत ५० वर्षांचा प्रवास केला साजरा

**छत्रपती संभाजीनगर, ४ जून २०२६ :** भारतातील आघाडीच्या वेगाने विक्री होणाऱ्या ग्राहक वस्तू उत्पादक समूहांपैकी एक असलेल्या आरएसपीएल समूहाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण केली असून, कानपूरपासून भारत आणि जागतिक स्तरावरील वाढत्या उपस्थितीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास अधोरेखित केला आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये कंपनीने "भारतामध्ये निर्मित, भारतासाठी" या दृष्टिकोनाला चालना देत देशभरातील २४ हून अधिक उत्पादन प्रकल्पांद्वारे देशांतर्गत उत्पादन क्षमतांना बळकट केले आहे.

या महत्त्वपूर्ण टप्प्याचे स्मरण करण्यासाठी, आरएसपीएल समूहाने एक लघुपट सादर केला आहे, जो कंपनीचा प्रवास, मूल्ये आणि विकसित होत जाणारी दृष्टी जिवंत करतो. प्रसिद्ध अभिनेते आणि चित्रपट निर्माते रजत कपूर यांच्या निवेदनातून साकारलेला हा चित्रपट भारतासोबत विकसित झालेल्या ब्रँडची भावना प्रतिबिंबित करतो.

हा समूह आपल्या प्रमुख ब्रँड घडी डिटर्जंटच्या स्थापनेला पाच दशके पूर्ण झाल्याचा उत्सव साजरा करत आहे. या ब्रँडची सुरुवात उत्तर प्रदेशातील कानपूरच्या मध्यवर्ती भागात श्री. मुरलीधर ज्ञानचंदानी आणि श्री. बिमल कुमार ज्ञानचंदानी यांनी केली होती. देशभरातील लाखो कुटुंबांचा विश्वास संपादन केलेल्या घडी डिटर्जंटला आज ३२ टक्के घरांमध्ये स्थान मिळाले आहे, जे गुणवत्ता आणि मूल्य यांच्याप्रती असलेल्या त्याच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे प्रतीक आहे. एका एकमेव दृष्टिकोनातून सुरू झालेला हा प्रवास आज जागतिक उद्योगसमूहात परिवर्तित झाला असून, आरएसपीएलची उत्पादने नेपाळ, बांगलादेश आणि इथिओपिया यांसारख्या अनेक देशांमध्ये पोहोचत आहेत.

आरएसपीएल समूहाने शिक्षण, आरोग्यसेवा, प्राणी कल्याण, पर्यावरण, पाणी आणि स्वच्छता, आपत्ती निवारण, क्रीडा प्रोत्साहन आणि समुदाय कल्याण यांसारख्या उपक्रमांना पाठिंबा देत मोठ्या प्रमाणावर समाज सशक्तीकरण केले आहे. समूहाने महिलांचा सहभाग वाढवून समान रोजगार संधींना प्रोत्साहन देत कर्मचारी सक्षमीकरण अधिक मजबूत केले आहे.

साबण आणि डिटर्जंटपासून सुरू झालेला हा समूह हळूहळू स्वच्छता सेवा, वैयक्तिक निगा, दुग्धजन्य पदार्थ आणि आइस्क्रीम, रासायनिक उत्पादन, फॅशन आणि जीवनशैली तसेच अन्न व पेय क्षेत्रांमध्ये मजबूत उपस्थिती असलेल्या विविध व्यवसाय समूहामध्ये विकसित झाला आहे. याशिवाय त्याचा विस्तार स्थावर मालमत्ता, पायाभूत सुविधा आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रांपर्यंत झाला असून, भारतातील अत्यावश्यक आणि भविष्याभिमुख क्षेत्रांमधील सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब दाखवतो.

राहुल ज्ञानचंदानी, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक, आरएसपीएल समूह म्हणाले, "पाच दशकांचा उत्सव साजरा करताना, कानपूरमधील घडी डिटर्जंटपासून घराघरांत आणि उद्योगांमध्ये विश्वासार्ह नाव बनण्यापर्यंतचा आरएसपीएलचा प्रवास आमच्या 'भारतामध्ये निर्मित, भारतासाठी' या तत्त्वज्ञानाच्या कायमस्वरूपी सामर्थ्याचे प्रतीक आहे. पुढे पाहता, आम्ही आमच्या साबण आणि डिटर्जंट विभागामध्ये नावीन्याधारित वाढीवर अधिक भर देत आहोत. यामध्ये मजबूत संशोधन क्षमता, ग्राहककेंद्री उत्पादन विकास, प्रगत सूत्ररचना आणि शाश्वत उत्पादन पद्धती यांचा समावेश आहे. गुणवत्ता सुधारणा, कार्यक्षमतेतील उत्कृष्टता आणि पुढील पिढीतील उपाययोजनांमध्ये सातत्याने गुंतवणूक करून, आम्ही भारतीय ग्राहकांच्या गरजांनुसार विकसित होणारी उत्पादने प्रदान करण्यासाठी आणि दीर्घकालीन जबाबदार विकास साधण्यासाठी कटिबद्ध आहोत."

# मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायद्याला विश्व हिंदू परिषदेचा विरोध

## प्रस्तावित कायदा देवस्थानांवर अन्याय करणारा; अतिक्रमित जमिनी मंदिरांकडे परत द्याव्यात - प्रा. संजय गायकवाड

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा असल्याचा आरोप विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांताध्यक्ष प्रा. संजय गायकवाड यांनी केला. देवस्थानांच्या जमिनींचे मालक स्वतः भगवान असून मंदिरांचे विश्वस्त व पुजारी हे केवळ व्यवस्थापक म्हणून कार्य करतात. त्यामुळे मंदिरांच्या जमिनींवरील अतिक्रमणे हटवून त्या पुन्हा मंदिरांच्या ताब्यात द्याव्यात, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली.

यावेळी विश्व हिंदू परिषद धार्मिक पूज्य क्षेत्र प्रमुख संजय मुद्राळे, मंदिर अर्चक-पुरोहित आयाम देवगिरी प्रांत प्रमुख राजीव जहागीरदार, कायदेशीर सल्लागार ॲड. माधवराव भोकरीकर, ॲड. विलास सोनवणे तसेच शिवाजीराव दहिवाल उपस्थित होते.

ॲड. माधवराव भोकरीकर यांनी सांगितले की, अनेक शतकांपासून विविध संस्थानिक आणि तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी मंदिरांच्या नित्य पूजाअर्चा, अन्नदान, उत्सव, धर्मशाळा, वेदपाठशाळा आणि गोशाळांच्या व्यवस्थापनासाठी जमिनी इनाम स्वरूपात दिल्या आहेत. प्रस्तावित कायदा लागू झाल्यास मंदिरांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम बंद पडण्याची शक्यता आहे.

ॲड. विलास सोनवणे यांनी सांगितले की, देवस्थानांच्या अनेक जमिनींवर भूमाफिया आणि गुंडांनी अतिक्रमण केले आहे. अशा जमिनी अत्यल्प दरात हस्तांतरित करण्यासंदर्भातील कोणत्याही कायद्याला विश्व हिंदू परिषदेचा ठाम विरोध आहे.

राजीव जहागीरदार यांनी शासनाने देवस्थानांच्या जमिनींबाबत तज्ज्ञ समिती नेमून सखोल अभ्यासानंतर कायद्याचा मसुदा तयार करावा, अशी मागणी केली. तसेच कोणताही निर्णय घेण्यापूर्वी राज्यातील देवस्थानांचे अर्चक, पुजारी, विश्वस्त आणि हिंदू संघटनांच्या प्रतिनिधींशी व्यापक चर्चा करून सर्वसंमतीने निर्णय घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

# गल्ले बोरगाव जि.प. शाळेला सीयसआर फंड मधून डिजिटल करा

## आमदार बंब यांना पालक वर्गाचे साकडे?



**खुलताबाद :** तालुक्यातील गल्ले बोरगाव येथील जिल्हा परिषद शाळा सुरु होण्याआधी सी यस आर फंड मधून डिजिटल, प्रयोग शाळा सुरु करा असे साकडे पालकवर्गा कडून खुलताबादचे लाडके तरुण तडफदार आमदार प्रशांतजी बंब यांना साकडे घातले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी कि, शाळा सुरु होण्या अगोदर डिजिटल शाळा सुरु झाल्यास विद्यार्थी वं विद्यार्थिनीला याचा नक्कीच मोठा लाभ होईल. अशी पालक वर्गात चर्चा चालू आहे. या फंडासाठी जेष्ठ समाजसेवक वसंता शिरसाट गल्ले बोरगावकर यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक दर्जा चांगला मिळावा तसेच शाळेत दहा वीस संगणक. दोन प्रिंटर, एक नवीन कलर झेरॉक्स मशीन वर्गात डिजिटल बोर्ड, टॅब, तसेच अत्याधुनिक प्रयोगशाळा, विददूत जोडणी, वायफाय, वीस खुर्च्या, टेबल अशा विविध शालेय वस्तूची मागणी खुलताबाद गंगापूरचे लाडके वं तरुण तडफदार आणि भावी कॅबिनेट मंत्री, सध्याचेआमदार प्रशांतजी बंब यांच्याकडे अशी इच्छा व्यक्त करण्यात आली.

गल्ले बोरगाव जिल्हा परिषद शाळा पाचवी ते दहावी पर्यंत वर्ग आहे. यात पाचसे चाळीश विद्यार्थी आहेत.त्यांना शिकवण्यासाठी पंधरा शिक्षक आहेत. चार शिक्षकांची जागा रिकामी आहे.

ग्रामीण भागात शिक्षक वं भौतिक सुविधाच्या अभाव यामुळे विद्यार्थ्यांची मोठी हेळसांड सुरु असल्याचे चित्र आहे.

जिल्हा परिषद शाळेअंतर्गत विदयार्थ्यांना प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्या साठीची जबाबदारी केंद्र वं राज्य शासनाने स्वीकार लेली आहे. मात्र ग्रामीण भागात दर्जेदार प्राथमिक शिक्षणा पासून वंचित राहत आहे.

# जागतिक सायकलिंग दिवस उत्साहात ; ज्येष्ठांचा दांडगा उत्साह





**छत्रपती संभाजीनगर :** वय हे फक्त एक मानसिक बंधन असतं, जर मनात इच्छा असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही." हे वाक्य आपण अनेकदा ऐकतो, पण वयाच्या ७० व्या वर्षी मी याचा प्रत्यक्ष अनुभव घेत शहरातील ज्येष्ठांनी तरुणांसोबत सायकल चालवत जागतिक सायकलिंग दिवस उत्साहात साजरा केला. व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनिअर पण वय ७९ वर्षे असलेले जयंत सांगवीकर आपले सहकारी सचिन गोडसे, उमेश भाले, जयंत आणि धनंजय भाले यांच्यासह रोजच्याप्रमाणे सकाळी क्रांतीचौकरोड,विद्यापीठ आदी मार्गाने सायकल फेरी काढत उत्साहात रवाना झाले. तर सकाळी 5.30 वाजता अतुल जोशी,मनीष खंडेलवाल यांनी करमाड गाठत परतीच्या प्रवासासह 50 किलोमीटर अंतर वेगाने पूर्ण केले. सायकलवरून निसर्गाच्या सानिध्यात फिरत व मानसिक ताणतणाव दूर करण्याचा अनुभव घेतला. सांगवीकर हे मागील तीन वर्षांपासून 'पंढरपूरची सायकल वारी'करत आषाढी एकादशी निमित्त सायकलवरून विठ्ठलाच्या दर्शनाला जातात. या वर्षीही जुलै महिन्यात पंढरीच्या विठूरायाला भेटण्यासाठी सायकलवरून जाण्याची माझी पूर्ण तयारी झाली आहे. दोन दिवसांत साधारण ३४० किलोमीटरचे अंतर पार करताना शरीराला थकवा जाणवत नाही. याचे कारण म्हणजे मनात असलेली विठ्ठलाची भक्ती आणि सायकलिंगमुळे शरीराला मिळालेली प्रचंड अंतर्गत ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. पत्नी आजारी आहे, तरी पंढरपूर वारीचे 1000 किमी चे चॅलेंज या महिना अखेर पूर्ण करणार आहे, असेही ते म्हणाले.यासह नारायण चकोर यांनी आजच्या दिवशी 50 किमी नॉन स्टॉप अंतर पूर्ण केले. कल्याण खोसे यांनी 21 किमी, आर.पाटील 53 किमी अंतर पूर्ण केले.

**प्रकाश गिरी यांची 150 किमी फेरी :** ज्येष्ठ सायकलिस्ट प्रकाश गिरी यांनी तब्बल 150 किमी सायकल चालवत आपल्या जबरदस्त इच्छाशक्तीचा प्रत्यय दिला.शिवाजी राजे यांनी 35 किमी तर अनिल टाकळीकर यानीही हा दिवस सायकलवरून फेरी मारत साजरा केला.

सर्व सायकलपटू पंढरपूरवारीची तयारी करत असून रविवारी डॉ. अमित समर्थ यांच्या आवाहनानुसार 50 किमी आभासी चॅलेंज तसेच पोलीस आयुक्तालय येथून स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया आयोजित "संडे ऑन सायकल " उपक्रमात सहभागी होणार आहेत,अशी माहिती छत्रपती संभाजीनगर सायकल संघटनेचे सचिव चरणजितसिंग संघा यांनी दिली.तसेच सायकलिस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.विजय व्हहारे,देवगिरी सायकलिंग क्लबचे अध्यक्ष पांडुरंग लहाने, तेजस्विनी सायकलिंग क्लबच्या माध्यमातून नागरिकांनी वैयक्तिक सायकलिंग केल्याचेही सांगितले.

# गायीला राष्ट्रीय दर्जा द्यावा – शेख आसिफ

## लवकरच मुस्लिम गौरक्षण समितीची स्थापना करणार

**छत्रपती संभाजीनगर :** ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंगच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत सामाजिक सलोखा, वक्फ संपत्तीचे संरक्षण, गोसंवर्धन तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर भूमिका मांडण्यात आली. यावेळी लवकरच मुस्लिम गौरक्षण समितीची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

यावेळी बोलताना ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंगचे महाराष्ट्र अध्यक्ष शेख आसिफ मेहबूब यांनी देशात तसेच महाराष्ट्रात जातीय सलोखा आणि बंधुभाव कायम राखणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नयेत तसेच समाजात शांतता आणि सौहार्द टिकून राहावे यासाठी शासन, प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिकांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

गोसंवर्धनाबाबत भूमिका स्पष्ट करताना शेख आसिफ यांनी गोहत्या बंदीच्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी समाजाचे सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच गायीला राष्ट्रीय दर्जा देण्यात यावा, अशी मागणी देशभरातून होत असून ऑल इंडिया उलेमा बोर्ड या मागणी चे समर्थन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गोरक्षणाच्या नावाखाली होणारे अत्याचार आणि कायदा हातात घेण्याच्या घटनांवर त्यांनी चिंता व्यक्त केली. गौरक्षकांनी कायदा हातात न घेता संशयास्पद बाबींची माहिती पोलिसांना द्यावी व पोलिसांच्या मदतीनेच कारवाई करावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली.

जिल्हाध्यक्ष सय्यद शहाबुद्दीन कादरी यांनी वक्फ संपत्तीवरील अवैध कब्जे हटविण्यासाठी वक्फ बोर्डाकडे निवेदन सादर केल्याची माहिती दिली. तसेच वक्फसंबंधित प्रलंबित तक्रारी व रखडलेली कामे तातडीने निकाली काढावीत, अशी मागणीही बोर्डामार्फत करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शहराध्यक्ष अशरफ पठाण यांनी शासनाच्या महसूल विभागाच्या १५ ऑक्टोबर २०२४ पूर्वीच्या अनधिकृत बांधकामांना नियमित करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. या योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. गुंठेवारी अंतर्गत बांधकामे नियमित झाल्यास पडेगाव, मिटमिटा, नारेगाव, सईदा कॉलनी, हर्सूल परिसरातील वस्त्यांमध्ये ड्रेनेज लाईन, रस्ते, पिण्याचे पाणी आदी मूलभूत सुविधा लवकर उपलब्ध होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत सामाजिक ऐक्य, धार्मिक सौहार्द, वक्फ मालमत्तांचे संरक्षण, गोसंवर्धन तसेच नागरिकांच्या विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंग समाजहिताच्या प्रश्नांवर पुढेही सक्रियपणे कार्य करत राहणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच गोसंवर्धन आणि सामाजिक सलोखा मजबूत करण्यासाठी लवकरच मुस्लिम गौरक्षण समिती स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती शेख आसिफ यांनी दिली.

या पत्रकार परिषदेस ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंगचे महाराष्ट्र अध्यक्ष शेख आसिफ मेहबूब, जिल्हाध्यक्ष सय्यद शहाबुद्दीन कादरी, शहराध्यक्ष अशरफ पठाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांतीचौकात 6 जूनला भव्य शिवराज्याभिषेक सोहळा

## गुणवंत विद्यार्थी, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा गौरव; ऐतिहासिक युद्धकलेची प्रात्यक्षिकेही आकर्षण

छत्रपती संभाजीनगर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त शनिवारी (६ जून) सकाळी ८.३० वाजता क्रांतीचौक येथे भव्य शिवराज्याभिषेक सोहळा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात मनपा शाळांतील दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते यांचा गौरव करण्यात येणार असून लाखो शिवभक्त आणि सर्वपक्षीय मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना शहरप्रमुख बाळासाहेब थोरात यांनी दिली.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला यंदा ३५३ वर्षे पूर्ण होत असून त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ शनिवारी (६ जून) क्रांतीचौक येथे भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या उपक्रमात यंदाही विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना शहरप्रमुख बाळासाहेब थोरात यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आगामी पिढीला शिवरायांच्या राज्याभिषेकाचा इतिहास आणि स्वराज्याची प्रेरणा प्रत्यक्ष अनुभवता यावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी, न्यायप्रिय प्रशासन, स्त्रीसन्मान आणि सर्वसमावेशक नेतृत्व आजच्या पिढीसमोर ठेवण्याचा प्रयत्न या सोहळ्यातून केला जात आहे.

कार्यक्रमात मनपा शाळांतील दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे, विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे, संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यंदाच्या सोहळ्यात कोल्हापूरच्या शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके, जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव, दांडपट्टा व तलवारबाजीचे सादरीकरण, ढोल-ताशांचा गजर आणि पारंपरिक पालखी सोहळा हे विशेष आकर्षण ठरणार आहे. गंगा नदीचे पवित्र जल तसेच विविध नद्यांचे आणि गड-किल्ल्यांवरील पाणी आणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा जलाभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात येणार आहे.

कार्यक्रमस्थळी ऐतिहासिक राज्याभिषेक सोहळ्याची प्रतिकृती उभारण्यात येणार असून मेघडंबरी, भालदार, चोपदार, हत्ती आणि तोफांच्या साक्षीने मंत्रोच्चारात हा सोहळा पार पडणार असल्याचे थोरात यांनी सांगितले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाचा पुनर्मूल्यांकन निकाल तात्काळ जाहीर करण्याची मागणी - सुमित पवार



छत्रपती संभाजीनगर,: डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाच्या हिवाळी २०२५ परीक्षेचा पुनर्मूल्यांकन निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

विद्यापीठाकडून पुनर्परीक्षेचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, पुनर्मूल्यांकनाचा निकाल प्रलंबित असल्याने अनेक विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षेचा अर्ज भरावा की नाही, याबाबत निर्णय घेणे कठीण जात आहे. पुनर्मूल्यांकनानंतर गुणांमध्ये बदल होण्याची शक्यता असल्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक तसेच मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष विद्यार्थी आघाडीच्या वतीने विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक यांना छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयामार्फत निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये संगणक अभियांत्रिकी विभागाचा हिवाळी २०२५ परीक्षेचा प्रलंबित पुनर्मूल्यांकन निकाल तात्काळ जाहीर करण्यात यावा, तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.

भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष राहुल दांडगे तसेच विद्यार्थी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष शिवराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी विद्यार्थी महामंत्री सुमित पवार यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या मांडल्या.पश्चिम शहराध्यक्ष गौरव जाटवे, पूर्व शहराध्यक्ष प्रसाद कोकाटे, शहर जिल्हा उपाध्यक्ष अनिरुद्ध ढवळे, ऋषिकेश वंजारे, आदित्य काटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगर-जालना विधान परिषदेसाठी गणेश लोखंडे महाविकास आघाडीचे उमेदवार



छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते गणेश लोखंडे यांना छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुक - 2026 साठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या सहमतीने लोखंडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला. सदरील निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून गणेश लोखंडे यांच्या विजयासाठी सर्व घटक पक्ष एकजुटीने काम करणार असल्याची घोषणा महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात आली.

## पडेगाव येथील निष्काळजी खोदकामाविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी



**छत्रपती संभाजीनगर :** पडेगाव परिसरात मुंबई-नाशिक महामार्गावरील रस्ता रुंदीकरणाच्या कामात महावितरणमार्फत अंडरग्राऊंड केबल टाकण्यासाठी करण्यात आलेल्या खोदकामात गंभीर निष्काळजीपणा झाला असून संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा अशी मागणी महानगरपालिका शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते गणेश लोखंडे यांनी पोलीस आयुक्तांना निवेदन देऊन केली आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी केबल टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले; मात्र खोदकामानंतर रस्ता पूर्ववत करण्याचे काम करण्यात आले नाही. त्यामुळे ठिकठिकाणी मोठे खड्डे निर्माण झाले असून विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना त्याचा अंदाज न आल्याने वारंवार अपघात होत आहेत. या अपघातांमध्ये अनेक नागरिक जखमी झाले असून काहींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे असल्याचे लोखंडे यांनी आपल्या पत्रात कळविले आहे.

विविध वृत्तपत्रांमधून वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही संबंधित कंत्राटदार तसेच कामावर देखरेख ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच पावसाळ्यापूर्वी रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण होणे आवश्यक असताना सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महावितरण यांच्या समन्वयाअभावी काम रखडले असून यामुळे आगामी पावसाळ्यात नागरिकांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता असल्याची माहिती या पत्रात गणेश लोखंडे यांनी दिली.

संबंधित कंत्राटदार, कामावर देखरेख करणारे अधिकारी आणि खोदकामास परवानगी देणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी गटनेते गणेश लोखंडे यांनी केली आहे. तसेच या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही लोखंडे यांनी दिला.

# ‘माझं गाव - आरोग्य संपन्न गाव’ अभियानाला जिल्ह्यात प्रतिसाद; ८७८ ग्रामपंचायतींची नोंदणी

## जूनमध्ये आरोग्य, स्वच्छता, योग व जनजागृतीचे विविध उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, राज्य शासनाच्या ‘माझं गाव – आरोग्य संपन्न गाव’ अभियानाला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून ग्रामस्तरावर आरोग्यदायी व स्वच्छ वातावरण निर्मितीसाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील सर्व ८७८ ग्रामपंचायतींनी या अभियानासाठी नोंदणी केली असून ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढत आहे.

मा. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. आणि मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, सनियंत्रण नोडल अधिकारी तथा जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे आणि जिल्हास्तरीय नोडल अधिकारी डॉ. शैलजा कुपस्वामी यांच्या अधिपत्याखाली अभियानाची यशस्वी अंमलबजावणी सुरू आहे.

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मे २०२६ अखेर जिल्ह्यात तालुकास्तरावर १०, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ५३ आणि उपकेंद्र स्तरावर ३०२ मेळावे आयोजित करण्यात आले. या मेळाव्यांमधून नागरिकांची आरोग्य तपासणी, निदान व उपचार करण्यात आले तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती देऊन व्यापक जनजागृती करण्यात आली.

शासनाच्या निर्देशानुसार दरमहा विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येत असून जून महिन्यात तालुका व ग्रामस्तरीय कृती दल समितीच्या बैठका, शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता आणि सकस आहाराचे महत्त्व पटवून देणारे कार्यक्रम, किशोरवयीन मुलामुलींसाठी विशेष आरोग्य शिबिरे व जीवनकौशल्य प्रशिक्षण, तसेच किशोरवयीन आरोग्य दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

याशिवाय १० ते १६ जूनदरम्यान नेत्ररोगांविषयी जनजागृती, वृक्षारोपण मोहिम, योग प्रशिक्षण कार्यक्रम, डेंग्यू व मलेरिया यांसारख्या कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती, तसेच घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य संकलन याविषयी विशेष अभियान राबविण्यात येणार आहे.

## महावीर इंटरनॅशनलचा ‘सुकून की छाँव’ उपक्रम; स्ट्रीट व्हेंडर्सना मोफत छत्र्यांचे वितरण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** रस्त्यावर व्यवसाय करणारे स्ट्रीट व्हेंडर्स तसेच श्रमिक वर्गाला उन्हाळा, पावसाळा आणि प्रतिकूल हवामानापासून दिलासा मिळावा यासाठी महावीर इंटरनॅशनलतर्फे “सुकून की छाँव” या विशेष सेवा अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत २ जुलै रोजी शहरातील गरजू लाभार्थ्यांना मोफत, मजबूत व उच्च दर्जाच्या छत्र्यांचे वितरण करण्यात येणार आहे.

या अभियानाअंतर्गत ४८ इंच आकाराच्या, ७ फूट स्टँडसह वॉटरप्रूफ आणि हेवी ड्युटी छत्र्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या छत्र्यांमुळे कडक उन्हात तसेच पावसाळ्यात काम करणाऱ्या श्रमिकांना संरक्षण मिळणार असून त्यांचे काम अधिक सुरक्षित आणि सुलभ होण्यास मदत होईल.

महावीर इंटरनॅशनलचे आंतरराष्ट्रीय संचालक वीर अनिलकुमार बांठिया यांनी सांगितले की, संस्था गेल्या ५१ वर्षांपासून “सबकी सेवा – सबको प्यार” या ब्रीदवाक्याखाली विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. संस्थेची देशभरात ३५० हून अधिक केंद्रे कार्यरत असून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि जनकल्याण क्षेत्रात सातत्याने काम सुरू आहे.

आंतरराष्ट्रीय अध्यक्ष वीर सीए अनिल जैन यांनी स्ट्रीट व्हेंडर्स व श्रमिक वर्ग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असल्याचे सांगत या अभियानामुळे त्यांच्या आरोग्य व कार्यक्षमतेत सकारात्मक बदल होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच छत्र्यांवर पर्यावरण संवर्धनाचे संदेश देण्यात येणार असल्याने जनजागृतीलाही चालना मिळणार आहे.

# अवजड वाहनांच्या विरुद्ध दिशेने होणाऱ्या वाहतुकीमुळे अपघात

## विरुद्ध दिशेने वाहने न सोडण्याची सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांची मागणी



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** पनवेल-जेएनपीटी महामार्गावरील उरण मधील चिरले परिसरात वैष्णो लॉजिस्टिक या आस्थापने अंतर्गत चालणाऱ्या अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात विरुद्ध दिशेने वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बेकायदेशीर वाहतुकीमुळे परिसरात वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले असून स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.



तसेच विरुद्ध दिशेने धावणाऱ्या अवजड वाहनांमुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे. परिसरातील शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा विशेष त्रास होत आहे. तरी सदर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन वैष्णो लॉजिस्टिक अंतर्गत चालणाऱ्या अवजड वाहनांच्या विरुद्ध दिशेने होणाऱ्या वाहतुकीवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांनी वाहतूक विभागाकडे केली आहे. त्वरित कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा अजित म्हात्रे यांनी प्रशासनाला दिला आहे.

आज पर्यंत उरण मध्ये बेकायदेशीर व अवैध वाहतूक मुळे अनेक जणांचे विनाकारण मृत्यू झाले आहे. तर काही ठिकाणी अपघात होऊन महत्वाचे हात पाय कायमचे निकामी झाले आहेत. अपघातामुळे अनेकांचे आयुष्य उद्धवस्त झाले आहे. त्यामुळे गोर गरीब जनतेची, नागरिकांची मागणी व त्यांच्या समस्या लक्षात घेता पर्यावरणवादी तथा सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांनी सदर समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. सदर समस्या त्वरित सुटली नाही तर नागरिकांचा मोठा उद्रेक होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच यावर त्वरित कारवाई करण्याची व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## दरवाढ, बेरोजगारी विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवेदन



**सोयगाव,दि.४ जून : :** पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून बेरोजगारी,कांद्याला मिळणारा अपुरा भाव आणि सर्वसामान्यांच्या वाढत्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दि.१ सोमवार रोजी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात इंधन दरवाढीमुळे शेतीचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच शेतकरी हिताचे निर्णय तातडीने घ्यावेत, पेट्रोल-डिझेलच्या दरांवर नियंत्रण आणावे, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात आणि शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शासनाच्या धोरणांविरोधात नाराजी व्यक्त करत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वाक्षरीयुक्त निवेदन सादर केले. मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल, असा इशाराही देण्यात आला.

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडी पूर्व तालुकाध्यक्ष सचिन शिंदे, वंचित बहुजन आघाडी पश्चिम तालुकाध्यक्ष गणेश सोनवणे मनोहर जगताप, दिलीप सुरवाडे, शिवराम जाधव, जितेंद्र मगरे, बाळू बेदवे, शरद नावकर, सुमित मगरे, भारत नावकर, सागर श्रीखंडे, अनंत बनकर, अरुण पारके, देवनाथ जाधव यांच्यासह आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अपघात होण्यापूर्वी जागे व्हा! खोपटे ग्रामस्थांचा प्रशासनाला इशारा"

## खोपटे-कोप्रोली काँक्रेट रस्त्यावर तातडीने गतिरोधक बसविण्याची ग्रामस्थ खोपटे यांची मागणी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**उरण / रायगड :** उरण तालुक्यातील खोपटे-कोप्रोली या नव्याने काँक्रेटीकरण करण्यात आलेल्या मुख्य रस्त्यावर वाहनांचा वाढता वेग नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी या मार्गावर तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) उभारावेत, अशी ठाम मागणी ग्रामस्थ मंडळ खोपटे यांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) व तहसील प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

उरण-खोपटा हा परिसरातील अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा मार्ग मानला जातो. रस्त्यालगत अनेक औद्योगिक कंपन्या असल्याने जड वाहनांची सतत ये-जा सुरू असते. नुकतेच रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला असून त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे याच मार्गावरून दररोज शेकडो शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्ण प्रवास करत असतात. रस्त्यावर गतिरोधक नसल्याने यापूर्वी किरकोळ अपघात घडले असून भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

ग्रामस्थ मंडळाने प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनात

कारवान गोडाऊन जवळ,धसाखोशी /द.पी. पाडा बस स्टॅन्ड, म्हात्रेपाडा बस स्टॅन्ड,आणि विरगो बस स्टॅन्ड.

या ठिकाणी तातडीने गतिरोधक व वाहतूक सूचना फलक उभारण्याची मागणी केली आहे. यावेळी ग्रामस्थ मंडळ खोपटेचे अध्यक्ष संतोष पाटील, सचिव कुमार ठाकूर, धसाखोशी अध्यक्ष कमलाकर म्हात्रे तसेच ग्रामस्थ मंडळाचे सल्लागार कल्पेश ठाकूर (गुरुजी) उपस्थित होते.

"रस्त्यांचा विकास स्वागतार्ह आहे; मात्र नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे आहे. एखादा निष्पाप जीव गमावण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. ग्रामस्थांच्या या मागणीची दखल घेत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा भविष्यात होणाऱ्या संभाव्य अपघातांना संबंधित यंत्रणाच जबाबदार राहील, असा इशाराही स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. भापकर यांची निवड

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

येथील सेवानिवृत्त विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांची अमरावती येथे होणाऱ्या स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे

डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी अमरावती, प्रेम किशोर सेक्सी चॅरिटेबल ट्रस्ट, वलगाव (जि. अमरावती) व त्रिवेणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शनिवार दि. ६ जून रोजी दुपारी बारा वाजता सिक्स रिसॉर्ट वलगाव, जिल्हा अमरावती येथे होणाऱ्या यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व स्पर्धा परीक्षा विद्यार्थी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे

डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन निवडणूक आयोगाच्या सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी श्रीमती भाग्यश्री बानायत, आयएएस नवी दिल्ली यांच्या हस्ते होणार असून या समारंभास असिस्टंट कमांडंट डॉ. चेतन शेलोटकर, नागपूरचे आरटीओ किरण बीडकर, अमरावती महाबँकेचे विभागीय महाप्रबंधक महेश डांगे आदी मान्यवर

यावेळी यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या हेम कृष्ण पिसदे, प्रज्वल नासरे, रेणुका केकान यांचा सत्कार होणार आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष पंजाबराव कथे, प्राचार्य डॉ. रामदास चावरे, प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे, सचिव सचिन माळकर आदींनी केले आहे.

# आ. रोहित पवार यांनी दिली करंजा बंदराला भेट

## मच्छिमार बांधवांच्या जाणून घेतल्या समस्या, समस्या सोडविण्याचे रोहित पवार यांचे आश्वासन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**उरण / रायगड :** दिनांक ३/६/२०२६ रोजी आमदार रोहित दादा पवार यांनी उरण तालुक्यातील करंजा गावाला भेट देऊन करंजा येथील प्रसिद्ध असलेल्या द्रोणागिरी मातेच्या मंदीराला भेट देऊन दर्शन घेतले. आणि द्रोणागिरी मंदाराला मिळालेला पर्यटनाचा दर्जा बाबत तसेच मंदीर परीसर शुशोभिकरणा बाबत ग्रामस्थांकडून सविस्तर माहीती घेतली. मच्छीमार समाजाचे तसेच शेतकरी वर्गाचे प्रश्न समजुन घेतले. मच्छीमार समाजाला भेडसावणाऱ्या विविध समस्सा बाबत करंजा मच्छीमार सोसायटी च्या कार्यालयाला भेट देऊन डिझेल कोटा, डिझेल परतावा, करंजा बंदरात मच्छीमारांना भेडसवणाऱ्या विविध समस्या ,मच्छीमारांच्या गावठान विस्ताराचा प्रश्न, मच्छीमारांची व्यापारी वर्गा कडून होणारी फसवणूक, शासना कडून नव्यानेचं मिळालेला शेतकरी दर्जा परंतु आत्ता पर्यंत मच्छीमार समाजाला याचा कोणत्याही प्रकारचा लाभ मिळालेला नाही या बाबत तसेच विवीध समस्स्यां बाबत सविस्तर माहीती घेतली. नव्यानेच सुरू असलेल्या करंजा रेवस पुलाची बोटीतुन पहाणी केली या पुलाच्या कामामुळे बाधीत मच्छीमार आणी शेतकरी वर्गाला मिळणाऱ्या नुकसान भरपाई बाबतीत तसेच या पुलाच्या कामामुळे होणाऱ्या अन्याया बाबतीत ग्रामस्थांसोबत चर्चा केली.

या सर्व समस्या बाबत आणि करंजा पोर्ट बाबत येणाऱ्या पावसाळी आधिवेशनात प्रश्न उपस्थित करून सरकारला धारेवर धरण्याबाबत आणि या सर्व प्रश्नाना मार्गी लावण्याबाबत मच्छीमार तसेच शेतकरी वर्गाला आश्वासित केले. या दौऱ्याचे आयोजन उरण नगपालिकेच्या नगराध्यक्षा भावना ताई घाणेकर यांनी यांनी केले.या वेळी सिताराम नाखवा, मार्तंड नाखवा, के एल कोळी, रमेश भगत, भारत नाखवा, रमेश नाखवा, जयेंद्र नाखवा नरेश कोळी, उरण नगरपालिकेचे राट्रवादी पक्षाचे सर्व नगरसेवक , सामाजिक कार्यकर्ते सचिन रमेश डाऊर, कल्पेश थळी, मधुकर थळी, कॉंग्रेस नेते भालचंद्र घरत. मनोहर थळी, शैलेश डाऊर, देवदास थळी, मुकेश थळी , परेश म्हात्रे आणि मोठ्या संखेने करंजा ग्रामस्थ उपस्थित होते.

# महानगराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे- विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सीएसएमआरडीए) अंतर्गत समाविष्ट गावांचा आणि झालर क्षेत्राचा नियोजनबद्ध, संतुलित, शाश्वत व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग नोंदवून परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश प्राधिकरणाचे आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयातील सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी विनय गौडा, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, सहआयुक्त अंजली धानोरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, प्रभारी उपायुक्त सुनंदा पारवे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी साधना बांगर तसेच एमआयडीसी, महसूल, ग्रामविकास व इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्तांनी प्राधिकरण स्थापनेचा मूलभूत उद्देश आणि कार्यपद्धती याबाबत अधिकाऱ्यांना सविस्तर माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत छत्रपती संभाजीनगर, गंगापूर, खुलताबाद, पैठण आणि फुलंब्री या पाच तालुक्यांतील एकूण ३११ गावांचा समावेश असून या संपूर्ण क्षेत्राच्या विकासासाठी विविध विकासकामांना गती देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन पाणीपुरवठा, रस्ते, वीजपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, अग्निसुरक्षा यांसारख्या मूलभूत सुविधांचे सक्षम नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यासाठी जीआयएस सर्वेक्षण, जमिनीचे मॅपिंग, विकास आराखड्यासाठी आवश्यक माहिती संकलन आणि तांत्रिक प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

प्राधिकरण क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणी, गुंठेवारी नियमितीकरण, वर्ग-२ मालमत्तांचे चुकीने वर्ग-१ मध्ये झालेल्या रूपांतरणाची प्रकरणे, हस्तांतरण न झालेल्या जमिनींचे विषय यावर कायदेशीर व नियमानुसार कार्यवाही करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. त्याचबरोबर अनधिकृत बांधकामांवर प्रभावी कारवाई करण्यासह प्रमुख मार्गालगतची अतिक्रमणे नियोजित कृती आराखड्यानुसार हटवण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम राबवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. महानगर प्रदेशाचा शाश्वत विकास साधायचा असेल तर घनकचरा व्यवस्थापनाला प्राधान्य देणे अत्यावश्यक असल्याचे सांगत विभागीय आयुक्तांनी वाळूज, शेंद्रा आणि बिडकीन औद्योगिक क्षेत्रांसह आवश्यक ठिकाणी जागा उपलब्ध करून आधुनिक कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याची प्रक्रिया गतीमान करण्याच्या सूचना दिल्या. शहरासह ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापनासाठी एकात्मिक व्यवस्था निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

यानंतर झालेल्या सीएसएमआरडीएच्या त्रिस्तरीय उपसमितीच्या बैठकीत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आणि नियोजित विकास साध्य करणे हेच प्राधिकरणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. प्राधिकरणातील रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ बाह्यस्त्रोत आणि कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करून घेण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. या मनुष्यबळ भरतीसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये अवलंबिल्या जाणाऱ्या कार्यपद्धतीचा आदर्श घेण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

तसेच विविध विकास प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नियुक्ती प्रक्रिया, निवड निकष आणि प्रशासकीय बाबींवर सखोल चर्चा झाली. यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. याशिवाय, विकास आराखड्याच्या अंमलबजावणीदरम्यान टीडीआर प्रदान करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेच्या धर्तीवर राबविण्याबाबतही सकारात्मक चर्चा करण्यात आली. एकूणच या बैठकीत महानगर प्रदेशाच्या भविष्यातील विकासासाठी आवश्यक नियोजन, पायाभूत सुविधा उभारणी आणि प्रशासकीय समन्वय यावर सखोल विचारविमय करण्यात आला.

### पशुसंवर्धन आयुक्तालयात राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीची बैठक

# राज्यातील 63 हजार पोल्ट्री व्यवसायाला थेट वीज बिल सवलत!

### शासकीय योजनांच्या लाभासाठी कुक्कुटपालकांना नोंदणीचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य सरकारने पशुसंवर्धन आणि कुक्कुटपालन व्यवसायाला 'कृषी क्षेत्राचा' अधिकृत दर्जा बहाल केल्यानंतर आता त्याचे थेट आर्थिक फायदे ग्राउंड लेव्हलवर मिळण्यास सुरुवात झाली आहे. या अंतर्गत राज्यातील तब्बल ६३ हजार पोल्ट्री व्यावसायिकांना शेती पंपाच्या धर्तीवर वीज बिलात थेट सवलत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, पशुसंवर्धन विभागाने या अचूक लाभार्थ्यांची यादी महावितरणकडे वर्ग केली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील पोल्ट्री उद्योगाला मोठी संजीवनी मिळणार आहे.

पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्तालयात आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीची एक अत्यंत महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत कुक्कुटपालन व्यवसायातील सद्यस्थिती, कायदेशीर नियमावली, आणि व्यावसायिकांना भेडसावणाऱ्या विविध प्रशासकीय अडचणींवर अत्यंत सखोल आणि तर्कशुद्ध मंथन करण्यात आले. या राज्यस्तरीय बैठकीस समितीचे सदस्य अनिल खामकर, डॉ. प्रसन्न पेडगावकर, शुभम महल्ले, धनंजय डांगे, विलास साळवी, सुदर्शन पोकळे, विठ्ठल चौधरी, शरद मोडांबे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

९० हजारांपैकी ६३ हजार लाभार्थी पात्र; उर्वरितांना तातडीने माहिती देण्याचे आदेश

पोल्ट्री व्यवसायाला वीज बिलात सवलत देण्यासाठी संपूर्ण राज्यातून एकूण ९० हजार लाभार्थ्यांची माहिती संकलित करण्यात आली होती. त्यापैकी ज्या व्यावसायिकांचा तपशील आणि कागदपत्रे अत्यंत अचूक होती, अशा ६३ हजार जणांची यादी पहिल्या टप्प्यात महावितरणकडे पाठवण्यात आली आहे. मात्र, उर्वरित २७ हजार व्यावसायिकांच्या माहितीमध्ये त्रुटी असल्याने ते अद्याप या लाभापासून वंचित आहेत. या सर्व कुक्कुटपालकांनी आपापल्या अचूक ग्राहक क्रमांकासह सर्व माहिती जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांच्या कार्यालयाकडे तातडीने सादर करावी, जेणेकरून कोणाचेही नुकसान होणार नाही, असे स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी या बैठकीत दिले. याच पार्श्वभूमीवर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम यांनीही जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांना आणि कुक्कुटपालकांना शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी जिल्हा कार्यालयात आपली अधिकृत नोंदणी करण्याचे जाहीर आवाहन केले आहे.

वारंवार लागणाऱ्या 'एनओसी'च्या कचाट्यातून शेतकऱ्यांची सुटका होणार!

कंत्राटी कुक्कुटपालन (Contract Farming) करणाऱ्या शेतकऱ्यांना कंपन्यांसोबत दरवेळी नवीन करार करताना ग्रामपंचायतीचे नवीन 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) आणावे लागते. या लालफितीच्या कारभारामुळे शेतकऱ्यांचा मोठा वेळ आणि पैसा वाया जातो, ही गंभीर समस्या समितीच्या सदस्यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली. एकदा मिळालेले प्रमाणपत्र पुढील सर्व करारांसाठी ग्राह्य धरण्यात यावे, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. यावर सकारात्मक

# पोलीस वसाहतीत विविहितेची गळफास घेऊन आत्महत्या; पतीसह सासरच्यांवर गुन्हा दाखल

### मुलगी झाल्याचे टोमणे आणि पैशांच्या त्रासाला कंटाळून उचलले टोकाचे पाऊल; परभणीतील घटनेत तिघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**परभणी :** महिला सन्मानासाठी देशात नवनवीन कायदे अमलात येत असतानाही, महिलांवर होणारे अत्याचार आणि त्रासाच्या घटना थांबताना दिसत नाहीत. परभणी शहरातील पोलीस वसाहतीमध्ये अशीच एक अत्यंत धक्कादायक आणि चीड आणणारी घटना समोर आली आहे. तुला मुलगी का झाली, मुलगा का झाला नाही असे म्हणून सतत टोमणे मारणे आणि वडिलांकडून पैसे आणण्यासाठी दिल्या जाणाऱ्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून एका पोलिसाच्या अठ्ठावीस वर्षीय पत्नीने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे. या प्रकरणी मयत विवाहितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस पतीसह सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोनम संदीप साळवे असे आत्महत्या केलेल्या दुर्दैवी विवाहितेचे नाव आहे. सोनम यांचे लग्न पोलीस कर्मचारी संदीप साळवे यांच्यासोबत झाले होते. लग्नानंतर काही दिवस सासरच्यांनी त्यांना चांगली वागणूक दिली; मात्र त्यानंतर विवाहीतेचा छळ करण्यास सुरुवात झाली. तुझ्या खर्चासाठी तुझ्या वडिलांकडून पैसे घेऊन ये, तुला मुलगी कशी झाली, मुलगा का झाला नाही असे म्हणत सासरचे लोक त्यांना सतत टोमणे मारत असत. या असह्य शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून अखेर सोनम यांनी दोन जून रोजी रात्री सव्वा अकरा वाजेच्या सुमारास पोलीस वसाहतीतील आपल्या राहत्या घरी गळफास घेतला.

या गंभीर घटनेनंतर मयत सोनम यांच्या आई जयश्री बसवंते यांनी पोलिसात धाव घेत सासरच्या छळाविरुद्ध रीतसर तक्रार नोंदवली. विवाहितेला मानसिक व शारीरिक छळ करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी परभणीतील नानलपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात तात्काळ कारवाई करत नवरा संदीप साळवे, सासू राधाबाई साळवे आणि आनंद ईश्वर, ननंद सविता हिवाळे, नंदोई किशोर हिवाळे आणि दिराचा सतरा वर्षांचा मुलगा यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

पोलीस वसाहतीतच घडलेल्या या संवेदनशील गुन्ह्यामुळे संपूर्ण शहरात मोठी खळबळ उडाली आहे. नानलपेठ पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत तिघांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या आत्महत्येप्रकरणी सासरच्या इतर सदस्यांची काय भूमिका होती, याचा शोध घेण्यासाठी पोलीस पुढील तपास अत्यंत गांभीर्याने करत आहेत.

# धर्मन वेल्फेअर असोसिएशनचा हरित संकल्प; 250 रोपांचे वृक्षारोपण

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कोलठाण येथे उपक्रम; 1 लाख वृक्ष लागवड मोहिमेला गती

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त धर्मन वेल्फेअर असोसिएशनतर्फे कोलठाण येथील खाटूश्याम मंदिर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत विविध प्रजातींच्या २५० रोपांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या १ लाख वृक्ष लागवड मोहिमेतील हा महत्त्वाचा टप्पा ठरला.



हा उपक्रम आमदार अनुराधा चव्हाण आणि डॉ. जीवन राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात युवक स्वयंसेवक, असोसिएशनचे सदस्य तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. समाजाच्या सक्रिय सहभागातून हरित आणि पर्यावरणपूरक भविष्य घडविण्याच्या आपल्या बांधिलकीचा पुनरुच्चार धर्मन वेल्फेअर असोसिएशनने यावेळी केला.

वृक्षारोपण मोहिमेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. रोहन जाधव, शुभम सोनवणे, साहिल शेळके, यश पाटील, डॉ. मोहिनी पाथ्रीकर, शॉन भालेराव, आर्यन वाघ, आर्या कुलकर्णी, जान्हवी कुलकर्णी, गजानन घाडमोडे, अनिकेत जाधव, कुणाल बोराडे, दीपिका गाडेकर, ऋषिकेश जाधव आणि मोहन गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित सदस्यांनी, "आज २५० रोपे, उद्यासाठी १ लाख वृक्ष; हरित आणि शाश्वत भविष्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊया," असा संदेश देत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली.

# विद्यापीठात आजपासून 'एज्युकेशन एक्सपो'; प्रज्ञावेधची जय्यत तयारी

### कुलगुरुंच्या हस्ते दोन दिवसीय शैक्षणिक प्रदर्शनाचे उद्घाटन; साठ दालनांमधून विद्यार्थ्यांना मिळणार विविध अभ्यासक्रमांची माहिती

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पहिल्यांदाच आयोजित करण्यात येत असलेल्या 'एज्युकेशन एक्सपो' म्हणजेच 'प्रज्ञावेध' या दोन दिवसीय प्रदर्शनाची विद्यापीठ प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली असून यंदाच्या वर्षात अनेक नावीन्यपूर्ण आणि व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. विद्यापीठातील विविध पदवी आणि पदव्युत्तर विभागांची क्षमता, तेथील संशोधन, विविध अभ्यासक्रम आणि त्यातून मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी या संदर्भात विद्यार्थी तसेच पालकांना




सविस्तर माहिती मिळावी, या उद्देशाने या विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते आज सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. या प्रसंगी प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, प्रभारी कुलसचिव डॉ. गणेश मंझा, सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता आणि संवैधानिक अधिकारी उपस्थित राहणार आहेत. हे प्रदर्शन दोन दिवस सकाळी दहा ते संध्याकाळी सहा या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार असून, संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी या एक्सपोला मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रदर्शनासाठी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागा शेजारील नवीन नाट्यगृहात भव्य साठ दालने (स्टॉल्स) उभारण्यात आली आहेत. या ठिकाणी मुख्य परिसरातील पंचेचाळीस विभाग आणि धाराशिव उपपरिसरातील दहा विभागांची दालने असणार आहेत. याशिवाय विद्यापीठ ग्रंथालय, प्री-आयएएस कोचिंग सेंटर आणि बजाज इन्क्युबेशन सेंटरची माहिती देणारी स्वतंत्र दालनेही येथे पाहायला मिळतील. प्रत्येक विभागाचे दालन सात बाय दहा फूट आकाराचे असून, प्रदर्शनाच्या पूर्वसंध्येला कुलगुरू आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संपूर्ण तयारीचा आढावा घेतला आहे.

विद्यापीठाच्या मुख्य परिसरामध्ये सध्या एकूण पंचेचाळीस पेक्षा जास्त पदवी आणि पदव्युत्तर विभाग कार्यरत आहेत. यामध्ये पदवी स्तरावरील सत्तावीस अभ्यासक्रम उपलब्ध असून त्याची प्रवेश क्षमता जवळपास नऊशेच्या घरात आहे. तर पदव्युत्तर स्तरावर चौर्याहत्तर अभ्यासक्रम चालवले जात असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता सुमारे तीन हजार इतकी आहे. या सर्व अभ्यासक्रमांची आणि प्रवेश प्रक्रियेची एकाच छताखाली विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाच्या माध्यमातून मिळणार आहे.

# अवैध गौण खनिज प्रकरणाच्या चौकशीचे तहसीलदार यांच्या लेखी आश्वासनाने आमरण उपोषणार्थींची माघार

**फर्दापूर :** सोयगाव दि.०४- अवैध गौणखनिजाच्या एकूण अठरा तक्रारी बाबत कारवाई करण्यात यावी यासाठी बुधवार पासून सुरू असलेल्या सोयगाव तहसील समोरील उपोषण दि.०४ गुरुवारी सायंकाळी चार वाजता तहसीलदार मनिषा मेने-जोगदंड यांच्या लेखी आश्वासनाने माघार घेण्यात आले. संदिप इंगळे आणि दिलीप शिंदे या दोन सामाजीक कार्यकर्त्यांनी तालुक्यातील अवैध गौण खनिजाच्या वाहतुकीची तब्बल १८ तक्रारी महसूल कडे केलेल्या होत्या पंधरा महिन्यांचा कालावधी लोटला परंतु महसूल विभागाने या तक्रारीकडे दुर्लक्ष करून कारवाई केली नव्हती या तक्रारींची एस आय टी चौकशी व्हावी यासाठी संदीप इंगळे,




दिलीप शिंदे यांनी बुधवार पासून सोयगाव तहसील समोर आमरण उपोषण सुरू केले होते यावर तोडगा काढण्यासाठी गुरुवारी सायंकाळी चार वाजता नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांनी चौकशी करून कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आमरण उपोषण ची माघार घेण्यात आली आहे दरम्यान यामध्ये प्रमुख तक्रारीत जरंडी येथील चिमणापूर धरणातून एका ठेकेदाराने प्लॉटींग साठी चारशे ब्रास विनापरवाना मुरुमाची वाहतूक केल्या ची तक्रार संदीप इंगळे यांनी (दि. २८) जानेवारी केली होती यावरून संबंधिताच्या मालकीचे गटावर १९६६ च्या कलम १४९ व १५० नुसार बोजा नोंद करण्यात येईल असे लेखी आश्वासन नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांनी दिले त्यामुळे उपोषणाची माघार घेतली आहे. पंधरा दिवसात शासकीय व मालकी हक्कात जास्तीचे उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासनात नमूद करण्यात आले आहे.



**अहिल्यानगर मॅरेथॉनमध्ये संभाजीनगरच्या धावपटूंची चमक छत्रपती संभाजीनगर:** अहिल्यानगर सायकलिंग क्लब,इंडियन आर्मीतर्फे आयोजित हिस्टॉरिक मॅरेथॉन स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या धावपटूंनी उल्लेखनीय यश संपादन करत आपला ठसा उमटवला. या स्पर्धेत मोठ्या संख्येने धावपटूंनी सहभाग नोंदविला होता.डोस

# फर्दापूर परिसरातील चार मोठ्या चोऱ्यांचा तपास रखडला; नागरिकांमध्ये तीव्र असंतोष

### तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांच्या बदलीमुळे नवीन सहाय्यक पोलीस निरीक्षकांसमोर गुन्हेगारांना पकडण्याचे आव्हान

**फर्दापूर :** फर्दापूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या परिसरात गेल्या दोन वर्षांत घडलेल्या चार मोठ्या आणि गंभीर चोरीच्या घटनांचा अद्यापपर्यंत कोणताही उलगडा न झाल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या सर्व प्रकरणांतील पीडित फिर्यादींनी पोलिसांकडे चोऱ्यांचा तपास वेगाने करून चोरीला गेलेला मौल्यवान ऐवज परत मिळवून देण्याची आर्त मागणी केली आहे.

**मिळालेल्या माहितीनुसार, फर्दापूर आणि परिसरामध्ये चोरीच्या खालील चार मोठ्या घटना घडल्या आहेत, ज्यांचा छडा लावण्यात पोलिसांना अजूनही यश आलेले नाही:**

- वरखेडी बुद्रुक तांडा येथे एका गरीब कुटुंबाच्या घराचे कडी-कोंडे तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा हजारो रुपयांचा ऐवज लंपास केला होता.



- फर्दापूर परिसरातील एका शेतकऱ्याच्या शेतातून पिकांच्या पाण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तीन विद्युत मोटारी चोरीला गेल्याची घटना घडली.
- फर्दापूर–सोयगाव मार्गावरील जैन मंदिर परिसरातून तीन अत्यंत मौल्यवान अशा पुरातन मूर्ती अज्ञात चोरांनी लंपास केल्या होत्या.
- एका माजी सैनिकाच्या बंद घराला लक्ष्य करून अज्ञात चोरांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा लाखो रुपयांचा मोठा ऐवज चोरून नेला होता.

या चारही मोठ्या चोरीच्या घटना घडल्या त्या काळात फर्दापूर पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून प्रफुल्ल साबळे कार्यरत होते. या सर्व प्रकरणांमध्ये पोलीस ठाण्यात रीतसर गुन्हे दाखल करण्यात आले असले तरी, तत्कालीन अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात चोरट्यांचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले नाही. दरम्यानच्या काळात, या सर्व चोऱ्यांचा तपास प्रलंबित असतानाच सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांची दुसऱ्या ठिकाणी बदली झाली

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911